आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप !
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा !

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ७३ । सोमवार, दि. १८ नोव्हेंबर २०२४ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## 'एनपीपी'चा भाजपला धक्का

**नवी दिल्ली ।** सुमारे वर्षभरापासून मणिपूरमध्ये हिंसाचार सुरु आहे. अनेक नागरिकांना आतापर्यंत जीव गमवावा लागला. मात्र हिंसाचाराच्या घटना कमी होत नाहीत. मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळून तेथील परिस्थिती चिघळली आहे. अशा स्थितीत नॅशनल पीपल्स पार्टीने (एनपीपी) बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे भाजपला मणिपूरमध्ये मोठा राजकीय धक्का बसला आहे. मणिपुरात एनपीपी आणि भाजपची युती संपुष्टात आली आहे. मणिपूरमधील परिस्थितीबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उद्या तातडीने बैठक बोलावली आहे. आज शहा यांनी महाराष्ट्रातील चारही प्रचारसभा रद्द करून दिल्लीकडे धाव घेतली.

## संपादकीय

### जीवावर बेतणारा अट्टहास

प्रसंगी जीव गेला तरी चालेल पण वेगाने वाहने हाकण्याचा, नियम मोडण्याचा आणि एकमेकांना ओलांडून पुढे जाण्याचा अट्टहास पूर्णच करू, असे बहुसंख्य वाहनचालकांनी ठरवले असावे. त्याशिवाय रस्ते अपघातांची संख्या कशी वाढू शकेल? जी दिवसेंदिवस वाढतच आहे. उत्तर प्रदेश बिजनोर येथे नुकताच एक भीषण अपघात घडला. वाहन ओलांडून (ओव्हरटेक) जाण्याच्या नादात झालेल्या अपघातात सात लोकांचा हकनाक बळी गेला. अशा कितीतरी घटना रोज घडतात. २०१४ ते २०२३ या १० वर्षात रस्ते अपघातात सुमारे १५ लाख लोकांचा मृत्यू झाला. रस्ते वाहतूक मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. रस्ते अपघातातील एकूण बळींमध्ये युवांची संख्या जास्त असल्याचे सांगितले जाते. या खात्याचे केंद्रीय मंत्री देखील अनेकदा जाहीर चिंता व्यक्त करतात. २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये राज्यात अपघातांची संख्या वाढली असल्याचे त्यात नमूद आहे. अती वेगाने आणि बेपर्वाईने वाहने चालवणे, नियमांचे पालन न करणे, मद्य पिऊन वाहन चालवणे आणि पादचारी रस्ता ओलांडत असताना न थांबणे ही त्याची काही काही कारणे सांगितली जातात. म्हणजे या चुकांमुळे झालेल्या अपघातांची जबाबदारी माणसांचीच म्हटली जाऊ शकेल का? रस्तोरस्तींच्या वेगमर्यादा, नियम यांचे सूचनाफलक लावलेले आढळतात. तथापि त्याकडे वाहनचालक सर्रास दुर्लक्ष करत असतात हे नव्याने सांगायला नको. ते नियम पाळण्याची जबाबदारी चालकांची असते. नियमांचा आदर करून सर्वांचाच जीव सुरक्षित ठेवण्याला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य देणे अपेक्षित आहे. तथापि तसे क्वचितच घडते. वेगाची नशा वाहनचालकांना मृत्यूच्या खाईकडे नेते हे आकडेवारीवरून लक्षात यावे. महामार्ग असोत अथवा गल्लीबोळातील रस्ते, वाहनांचा वेग कमी होत नाही. उलट त्याचे आकर्षण वाढते. अमूक किलोमीटरचे अंतर किती मिनिटात किंवा तासात कापले हेच गौरवान्वित केले जाते. असा तथाकथित पराक्रम करणाऱ्या युवांना त्यांची पिढी हिरो मानते. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून वेगाने वाहने हाकणाऱ्यांची संख्या वाढतच जाते. तसतसे अपघात घडण्याचा संभवही वाढणे स्वाभाविकच. मद्य पिऊन गाडी चालवणाऱ्यांच्या बाबतीतही हेच घडते. रात्रीच्या वेळी मद्य पिऊन गाड्या हाकतात आणि अपघातांचे कारण ठरतात. याला अटकाव करण्यासाठी अनेक कायदे आहेत. त्यांचे नियम आहेत. ते मोडणाऱ्याला जबर दंड व शिक्षेची तरतूद देखील आहे. पण त्याची अंमलबजावणी तितक्याच कठोरपणे अनुभवास येत नाही. मग त्यातही भिडभाड वाहनचालकही ठेवत नाहीत असा हा सगळा गुंता आहे.

# मुंबईला हात घातला तर खबरदार!

## महाविकास आघाडीच्या सभेत उद्धव ठाकरे यांचा भाजपला इशारा

**मुंबई । वृत्तसंस्था**

मुंबईवर घाला घातला तर हम काटेंगे, असे म्हणत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला. भाजपच्या 'बटेंगे तो कटेंगे'या घोषणेवर हल्ला चढवताना ठाकरे यांनी भाजपला हा इशारा दिला.



आजच्या रविवारचे औचित्य साधून महाविकास आघाडीने येथील बीकेसी मैदानावर जाहीर सभा आयोजित केली. सभेला महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांनी आपल्या आक्रमक भाषणात भाजपवर चौफेर हल्ला चढवला. विधानसभा निवडणूक प्रचाराचा उद्या शेवटचा दिवस आहे. दुसऱ्या दिवशी 'प्रचारतोफा थंडावल्या'अशा बातम्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होतील. खरे तर तोफा महाविकास आघाडीकडे आहेत. महाझुटी महायुतीकडे नुसत्या थापा आहेत. २३ तारखेनंतर ही महाझुटी महायुती नाहीशी होणार आहे, असा टोलाही ठाकरे यांनी सत्ताधारी महायुतीला लगावला.

राज्यातील विधानसभा निवडणुकीची लढाई कोण जिंकणार? महाराष्ट्रद्रोही जिंकणार की महाराष्ट्रप्रेमी? छत्रपती शिवाजी महाराज यांचा मावळा जिंकणार की मोदी-शहा-अदाणी यांचा नोकर जिंकणार? ते ठरवणारी ही निवडणूक आहे. आमचा मुंबई तोडण्याचा अपप्रचार नाही. या सरकारला मुंबईचा जीडीपी वाढवायचा आहे. त्यासाठी त्यांना ही मुंबई मोठमोठ्या बिल्डरांना द्यायची आहे. नव्हे मुंबई द्यायला त्यांनी सुरूवात केली आहे, पण खबरदार, मुंबईवर घाला घालाल तर... अशा शब्दांत ठाकरे यांनी भाजप आणि महायुतीला सूचक इशारा दिला.

मुंबई ही स्वायत्त आहे. ती देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यांना मुंबईचे महत्त्व कमी करायचे आहे. त्यांना मुंबई केंद्रशासित प्रदेश करता येत नाही. तोडण्याची भाषा करता येत नाही म्हणून येणकेणप्रकारे ते मुंबईवर घाव घालत आहेत, असेही ठाकरे म्हणाले.

# सिंहस्थासाठी हवा तेवढा निधी

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा शब्द

**नाशिक । प्रतिनिधी**

तुम्हाला काम करणारे आमदार हवेत? असा परखड सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नाशिककरांना करताना महाविकास आघाडीच्या उमेदवारांवर चांगलेच तोंडसुख घेतले. गेल्या सिंहस्थात तीन हजार कोटींचा निधी नाशिकला दिला होता. येत्या सिंहस्थासाठी हवा तेवढा निधी दिला जाईल. मात्र, त्यासाठी महायुतीला विजयी करा, असे आवाहन त्यांनी जाहीर सभेत केले.



नाशिक मधील महायुतीचे उमेदवार देवयानी फरांदे, सीमा हिरे, राहुल ढिकले, सरोज आहिरे यांच्यासाठी आज येथे जाहीर सभा झाली. त्यावेळी फडणवीस यांनी मनोगत व्यक्त केले. नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा देशातील सर्वोत्तम कुंभमेळा झाला पाहिजे. त्यासाठी हवा तेवढा निधी देण्याची तयारी आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अडीच वर्षाच्या काळात त्यांनी केलेले एकतरी भव्य काम दाखवून द्यावे, **(पान ६ वर)**